# मुंबई पत्तन न्यास कर्मचारी
# भरपाई (शहर) भत्ता नियम, १९७५

# मुंबई पत्तन न्यास कर्मचारी
# भरपाई (शहर) भत्ता नियम, १९७५

--------

## अनुक्रमणिका

----


| नियम | तपशिल | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | संक्षिप्त शीर्षक व प्रारंभ | १ |
| २ | नियम लागू होणे | १-२ |
| ३ | व्याख्या | २-३ |
| ४ | भत्यासाठीची पात्रता व त्याचे दर | ३-४ |
| ५ | वेगवेगळ्या परिस्थितीमधील भत्याबााबत नियम | |
| | अ) रजा | ४ |
| | ब) प्रशिक्षणासाठी भारताबाहेर जाणे | ४-५ |
| | क) भारतामधील प्रशिक्षण | ६ |
| | ड) निलंबन | ६ |
| | ई) पुर्ननियुक्ती | ६-७ |
| ६ | या नियमांमध्ये न दिलेल्या पथिस्थतीमध्ये शासनाचे आदेश लागू होणे | ७-८ |
| ७ | खंडन व व्यावृत्ती | ८ |

# मुंबई पत्तन न्यास कर्मचारी
# भरपाई (शहर) भत्ता नियम १९७५

----

मेजर पोर्ट ट्रस्ट ॲक्ट, १९६३ (१९६३ चा ३८ वा), कायद्याचा कलम २८ (ब) आणि (क) मधील प्रदत्त अधिकारांनुसार व सध्या आस्तित्वात असलेल्या नियमांच्या ऐवजी, उपरोक्त कायद्याच्या कलम १२४ (१) नुसार केंद्र सरकारच्या मान्यतेने मुंबई पत्तन न्यासाच्या विश्वस्त मंडळाने खालील नियम केले आहेत. सदर नियम उपरोक्त कायद्याच्या कलम (२) नुसार शासनाच्या अधिकृत पत्रिकेच्या दोन सलग अंकात प्रसिध्द केले आहेत.

## १) संक्षिप्त शीर्षक व प्रारंभ

(१) या नियमांना मुंबई पत्तन न्यास कर्मचारी भरपाई (भत्ता ) नियम १९७५ असे म्हटले जाईल.

(२) हे नियम शासकीय मान्यता प्राप्त झाल्याचे ज्या दिवसाच्या अधिकृत शासकीय पत्रिकेत प्रसिध्द होईल त्या दिवसापासून लागू होतील.

## २) नियम लागू होणे

या नियमांत व्यावृत्तीचे प्रावधान नसेल तर हे नियम मंडळाच्या सर्व कर्मचा-यांना लागू होतील, मात्र खालील व्यक्तींना लागू होणार नाहीत.

(अ) प्रायोगिक किंवा अर्धवेळ तत्वावर नेमल्या गेलेल्या व्यक्ती,

(ब) अकस्मात निधीतून ज्या व्यक्तीना वेतन दिले जाते,

(क) केंद्र वा राज्य शासन किंवा स्थानिक वा अन्य प्राधिकरणातून प्रतिनियुक्तीवर मर्यादित काळासाठी नेमणुक झालेल्या व्यक्ती,

(ड) तदर्थ किंवा वैयक्तिक वेतन तत्वावर नेमलेल्या व्यक्ती मात्र त्यांच्या नेमणूक पत्रामध्ये त्याना वेतना व्यतिरिक्त भरपाई (शहर) भत्ता असल्याचा उल्लेख नसला तरच त्याना हे नियम लागू होणार नाहीत,

(ई) शिकाऊ व्यक्ती.

**(३) व्याख्या:**

या नियमांमध्ये संदर्भासाठी अन्य अर्थ आवश्यक नसल्यास : -

(अ) मंडळाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व विभागाध्यक्ष या संज्ञाना मेजर पोर्ट ट्रस्ट ॲक्ट १९६३ (३८/१९६३) यामध्ये जो अर्थ दिला आहे, तोच अर्थ लागू होतो.

(ब) 'कर्मचारी' म्हणजे मंडळाचे कर्मचारी.

(क) मुंबई पत्तन न्यासाचे पगार, भत्ते, रजा, पेन्शन नियम यांचे पुस्तक नववी आवृत्ती यामध्ये कलम ११(११) मध्ये दिलेली वेतन या सज्ञेची जी व्याख्या दिली आहे, तीच व्याख्या या नियमांखाली लागू होते. त्यामध्ये जेथे अनुज्ञेय आहे तेथे महागाई वेतन सुध्दा सामील आहे.

(ड)(i) श्रेणी १ चे पद म्हणजे जास्तीत जास्त दरमहा रूपये ११००/- रुपये वेतन असलेले पद किंवा ज्या श्रेणीत जास्तीत जास्त वेतन रु.११००/- आहे असे वेतन श्रेणीतील पद.

(ii) श्रेणी २ चे पद म्हणजे जास्तीत जास्त रु.६५०/- पेक्षा जास्त पण रु.११००/- पेक्षा कमी वेतन असलेले पद किंवा ज्या श्रेणीत जास्तीत जास्त वेतन रु.६५०/- पेक्षा जास्त आहे, पण रु.११००/- पेक्षा कमी आहे किंवा ज्या श्रेणीत जास्तीत जास्त वेतन रु.६५०/- पेक्षा जास्त पण रु.११००/- पेक्षा कमी आहे अशा श्रेणीतले पद.

(iii) श्रेणी ३ चे पद म्हणजे जास्तीत जास्त वेतन रु.१६०/- पेक्षा जास्त पण रु.६५०/- पेक्षा कमी किंवा ज्या श्रेणीत जास्तीत जास्त वेतन रु.१६०/- पेक्षा जास्त आहे, पण रु.६५०/- पेक्षा कमी आहे अशा श्रेणीतील पद.

(iv) श्रेणी ४ चे पद म्हणजे जास्तीत जास्त वेतन रु.१६०/- आहे असे पद किंवा ज्या श्रेणीत जास्तीत जास्त वेतन रु.१६०/- आहे अशा श्रेणीतील पद.

(ई) येथे दिलेल्या शब्दांचे व संज्ञांचे अर्थ वा व्याख्या जर दिले नसतील परंतु मुंबई पत्तन न्यास वेतन, भत्ते, रजा व पेन्शन पुस्तक ९ वी आवृत्ती यामध्ये किंवा मुंबई पत्तन न्यास कर्मचारी (रजा) नियम १९७५ मध्ये जर त्या शब्द व संज्ञांचा अर्थ दिला असेल तर तो अर्थ या नियमात सुध्दा मान्य केला आहे.

## (४) भत्त्यासाठी पात्रता व भत्त्याचे दर

(१) या नियमात अन्यथा प्रावधान केले नसल्यास तृतीय किंवा चतुर्थ श्रेणीच्या कर्मचा-याना त्यांच्या पगाराच्या १०% रक्कम भरपाई (शहर) भत्ता देय होईल. जर तो प्रथम व द्वितीय श्रेणीचा कर्मचारी असेल, तर त्याना त्यांच्या पगाराच्या १०% रक्कम परंतु जास्तीत जास्त रु.१००/- दरमहा इतकी रक्कम त्याना भत्ता (शहर) म्हणून देय होईल.

(२) भरपाई (शहर) भत्ता विवाहित तसेच अविवाहित कर्मचा-याना देय होईल. जर कर्मचारी मुंबई बाहेर प्रवासासाठी गेला, तरी तो त्याला देय होईल. जर पती व पत्नी दोघेही

मंडळाचे कर्मचारी असतील, तर जर अन्यथा त्याना भत्ता देय असेल तर त्यांच्या पगारावर अवलंबून त्या दोघांनाही भत्ता देय होईल.

**(५) वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये भत्त्याचे नियमन:**

भरपाई (शहर) भत्ता खालीलप्रमाणे घेता येईल.

(अ) रजा -

कर्मचारी रजेवर जाण्याआधी ज्या दराने त्याला भरपाई (शहर) भत्ता मिळत होता त्याच दराने तो त्याला रजेवर गेल्यावरही मिळेल. यासाठी 'रजा' या शब्दाचा अर्थ एकूण १२० पेक्षा जास्त नाही अशा तऱ्हेची रजा. जर रजा १२० पेक्षा जास्त दिवसांची असेल तर पहिले १२० दिवस, पण त्यात निवृत्तीची तयारीची रजा, नोकरीचा अंत करण्याच्या त ायारीची रजा, नाकारलेली रजा, शेवटची रजा किंवा वैद्यकीय प्रमाणपत्रावर घेतलेली रजा वगळून घेतलेली असाधारण रजा यांचा जेव्हा सुट्टयाना जोडून घेतली जाते तेव्हा सुट्टयांचा कालखंड व रजेचा कालखंड हा पूर्ण रजेत समाविष्ठ केला जाईल.

टीप:

(i) जर एखाद्या कर्मचा-याला त्याची तब्येत बरी नसल्याने पुढे काम करु शकत नाही अशा कारणामुळे रजा मंजूर झाली तर त्याने त्या रजेबद्दल आधीच घेतलेल्या भरपाई (शहर) भत्त्याची वसुली केली जाणार नाही.

(ii) जर एखादा कर्मचारी वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे रजेवर असताना तो क्षयरोग, कर्करोग यानी बाधित झाला, तर ती रजा सुरुवातीपासूनच वैद्यकीय कारणासाठी घेतली किंवा इतर रजा चालू असताना तो आजारी पडला, यापैकी काहीही असले, तरी त्याची रजेची १२० दिवसांची मुदत ८ महिन्यांपर्यंत वाढवली जाईल. सदर आठ महिन्यांची मुदत अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष त्यांच्या मर्जीने अधिक काळासाठी वाढवू शकतात. तसेच अर्जाबरोबरील वैद्यकीय प्रमाणपत्रावर मंडळाच्या वैद्यकीय अधिकाऱ्याने स्वाक्षरी किंवा प्रतिस्वाक्षरी केली पाहिजे.

(ब) कर्मच्याऱ्याला भारताबाहेर प्रशिक्षणासाठी पाठवल्यास:

अशा परिस्थितीमध्ये कर्मचारी भारताबाहेर असलेल्या काळासाठी त्याला देय असल्याने भरपाई (शहर) भत्ता मिळेल.

(क) भारतामध्ये प्रशिक्षण:

ज्या कर्मचा-याला भारतात प्रशिक्षणासाठी किंवा सूचनेसाठी पाठविले असेल, तो त्या काळासाठी सेवेत आहे असे समजले जाईल व त्याला वेळोवेळी देय असलेल्या दराने त्याला भरपाई (शहर) भत्ता देय असेल.

(ड) निलंबन:

ज्या कर्मचाऱ्याला निलंबित केले आहे त्याला निलंबित करणारे अधिकारी त्या कर्मचा-याला निलंबित केल्याच्या दिवसाच्या वेतनावर अवलंबून जो दर मान्य करतील त्या दराने, तसे त्या अधिकाऱ्यांनी घालून दिलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून त्याला तो भरपाई (शहर) भत्ता देय होईल.

(ई) पुनर्नियुक्ती:

जर एखाद्या कर्मचा-याला मंडळाच्या सेवेत पुनर्नियुक्त केले तर त्याला खालीालप्रमाणे प्रावधानांच्या अधीन राहून भरपाई (शहर) भत्ता द्यावा.

(अ) जर त्याला निवृत्तीवेतन (पेन्शन) योजना लागू होत असेल तर भरपाई (शहर) भत्ता हा तो ज्या पदावर पुनर्नियुक्त झाला असेल त्या पदाला जास्तीत जास्त किती वेतन देय आहे, त्याच्या आधारे काढला जावा. जर त्याचा पगार अधिक निवृत्ती वेतन हे जास्तीत जास्त वेतनापेक्षा जास्त होत असेल, तर ह्या भरपाई (शहर) भत्त्याचा हिशोब जास्तीत जास्त वेतनाच्या आधारे भरावा व इतर सर्व बाबतीत ते वेतन अधिक निवृत्ती वेतन यांचे आधारे काढावा.

(ब) सदर कर्मचारी जर सहभागी भविष्य निर्वाह निधी या योजने अंतर्गत येत असेल तर ज्या पदावर तो कर्मचारी पुनर्नियुक्त झाला आहे त्या पदावर त्याला किती वेतन मिळाले असते, त्यातून त्याच्या सेवानिवृत्तीच्या फायद्यामधून पेन्शनची समकक्ष रक्कम वजा न केल्यावर येणा-या रक्कमेच्या आधारे हा भरपाई (शहर) भत्ता ठरवला जाईल.

**(६) या नियमांमध्ये ज्या बाबींबद्दल काहीही प्रावधाने केलेली नाहीत, त्याना शासकीय आदेश लागू होणे :**

या नियमांमध्ये किंवा त्यानंतरच्या दुरुस्त्यांमध्ये ज्या बाबींबद्दल काहीही प्रावधाने केली नाही त्याना सर्वसामान्यपणे कर्मचाऱ्यांच्या बाबतीत व जेवढया मंडळाच्या आवश्यकतेनुसार स्वीकारता येतील तितक्या लागू होतील.

## (७) खंडन व व्यावृत्ती:

हे नियम लागू होण्याआधी या बाबतीत लागू असलेले व अंमलात असलेले सर्व नियम रद्द केले जात आहेत. मात्र या आधीच्या नियमानुसार (जे आता रद्द केले आहेत) केलेल्या सर्व कृती व उचललेली सर्व पाऊले या आता अंमलात आलेल्या प्रावधानाां अंतर्गत केलेली आहेत असे समजण्यात येईल.

c2/Regulation marathi/CCA reg. Marathi